

# आधुनिक मानसशास्त्राच्या प्रकाशांत स्त्री

***स्त्री आणि पुरुष निसर्गतःच भिन्न असल्यामुळे त्यांचीं जीवनांतील कार्यक्षेत्रें वेगळीं असावीं असें परंपरागत मत आहे, तर त्याच्या अगदीं अुलट-- स्त्री-पुरुषांतले भेद रूढिजनित आहेत व नैसर्गिक भेद विशेष महत्त्वाचे नाहीत असें दुसरें मत अैकण्यांत येअूं लागलें आहे. याविषयी आधुनिक मानसशास्त्राला काय म्हणायचें आहे त्यासंबंधीचें विवेचन या लेखांत वाचा. तें तुम्हाला विचारप्रवर्तक वाटेल.***

**लेखक : नी. र. वऱ्हाडपांडे**

★

सामाजिक चालीरीतींचें मूल्यमापन धर्मग्रंथांच्या आधारें करावें अशी प्राचीन काळीं चाल होती. ही चाल अजूनहि पूर्णपणें नाहीशी झालेली नाही, हें राजकन्या मार्गारेट हिला अेका घटस्फोटित पुरुषाशीं विवाह करण्याच्या विरुद्ध धर्मगुरूंनी सल्ला दिला व तिनें तो शिरोधार्य मानला यावरून दिसून येतें. असें असलें तरी पूर्वीच्या मानानें सामाजिक चालीरीतींचें नियमन करण्याचें धर्मग्रंथ व धर्मगुरू यांचें सामर्थ्य पुष्कळच कमी झालें आहे यांत संशय नाही.

चालीरीतींच्या बाबतींत धर्माचें महत्त्व अेकीकडे कमी होत आहे त्याचप्रमाणें विज्ञानाचें महत्त्व वाढतें आहे. सामाजिक रूढि व नीतिमत्ता हीं क्षेत्रें विज्ञानाच्या कक्षेबाहेरचीं आहेत असें अेक मत बरेंच दिवस प्रचलित होतें. पण आता, नीतिकल्पनांचें तार्किक विश्लेषण करणारें तत्त्वज्ञान, नीतिमत्तेच्या मानसिक स्वरूपावर प्रकाश टाकणारें मानसशास्त्र व व्यक्तीच्या आचरणाचा समाजावर काय परिणाम होतो याचा विचार करणारें समाजशास्त्र यांच्या कक्षेंत नीतीचा समावेश होतो व कोणत्याहि चालीरीतीचें मूल्यमापन या तीन शास्त्रांच्या आधारें होअूं शकतें हें मत सर्वमान्य होत चाललें आहे.



स्त्रीवर मातृत्व बहुधा लादलें जातें.

या दृष्टीने आधुनिक मानसशास्त्रानें स्त्री-पुरुषांच्या मनोरचनेविषयीं काय शोध लावले आहेत याचा मागोवा घेणें फार अुपयुक्त ठरेल. विशेषतः स्त्री-पुरुषांमध्ये कोणते भेद आहेत व त्या भेदांचें महत्त्व काय आहे याचा निर्णय करणें आवश्यक आहे. कारण स्त्री-पुरुषसंबंधांच्या बाबतींत स्त्री-पुरुष निसर्गतःच भिन्न असल्यामुळे त्यांचीं जीवनांतील कार्यक्षेत्रें वेगळीं असावीं असें परंपरागत मत आहे, तर याच्या अगदी अुलट स्त्री-पुरुषांतले बहुतेक भेद रूढिजनित आहेत व नैसर्गिक भेद विशेष महत्त्वाचे नाहीत, त्यामुळे स्त्री-पुरुषांचें कार्यक्षेत्र अेकच समजण्यांत यावें, रूढीनें त्यांच्यांत कोणताहि भेद करतां कामा नये असें त्याच्या अगदी विरुद्ध मत अलीकडे क्वचित् अैकण्यांत येतें. तेव्हा याविषयी आधुनिक मानसशास्त्राला काय म्हणायचें आहे हें पाहूं.

## बुद्धि आणि बल

स्त्री-पुरुषांतले कांही भेद कुणालाहि सहज कळण्यासारखे आहेत. गर्भधारणा फक्त स्त्रीलाच करतां येते याबद्दल कुणी वाद करणार नाही. त्याचप्रमाणे सख्खी भावंडें घेतलीं तर साधारणपणें भाअू बहिणीपेक्षा आकारानें मोठा व अधिक शक्तिमान् असतो हीहि नित्याच्या परिचयाची गोष्ट आहे. मात्र पुरुष स्त्रीपेक्षा अधिक शक्तिमान् असला तरी त्याचा कस स्त्रीपेक्षा अधिक असतो की काय हें सांगतां येत नाही. वेगानें पळतांना लवकर दमछाकी न होणें, मार बसला असतां तिरीमिरी न येतां तो सहन करतां येणें, पदाग्रावर बराच वेळ अुभें राहिलें असतां कळ न लागणें, अन्न, पाणी व झोप यांशिवाय अधिक वेळ काम करतां येणें यांसारख्या अनेक क्रियांनी शरीराचा कस अजमावला जाअूं शकतो. या बाबतींत स्त्री पुरुषाला हार जाअीलच असें सिद्ध करणें कठीण आहे.

शारीरिक शक्तीप्रमाणेच बुद्धिमत्तेच्या बाबतींतदेखील स्त्री पुरुषाच्या मानानें कमी असते असा कांही लोकांचा समज आहे. पण या समजाला फारसा आधार नाही हें बुद्धिमत्तेच्या मानसशास्त्रीय कसोट्यांनी अलीकडे सिद्ध झालें आहे. तुलनेस योग्य असे मुलांमुलींचे गट घेतले तर बुद्धिमत्तेच्या कसोट्यांवर मुलांपेक्षा मुलींना नेहमीच कमी गुण मिळतात असें दिसत नाही. अेवढेंच नव्हे, तर मुलांच्या सरासरी गुणांपेक्षा मुलींचे सरासरी गुण अधिक भरल्याचीं



स्त्रियांचे विभ्रम हे ‘ अेके काळीं असे होते ’ या सदरांत जाअून पडतील.

देखील अनेक अुदाहरणें दाखवून देतां येतात. वेस्लर या मानसशास्त्रज्ञानें घेतलेल्या कसोट्यांमध्ये स्त्रियांचीच बुद्धिमत्ता पुरुषांपेक्षा अधिक भरली. ज्या कसोट्यांमध्ये भाषेचा वापर करून प्रश्न विचारले जातात त्या कसोट्यांमध्ये स्त्रिया पुरुषांपेक्षा जास्त यशस्वी होण्याचा संभव अधिक असतो असेंहि आढळून आलें आहे.

बुद्धिमत्तेप्रमाणेच कलात्मकता, संघटनाचातुर्य वगैरे अनेकविध व्यवसायांना लागणाऱ्या अनेकविध गुणांमध्ये स्त्रिया पुरुषांपेक्षा सर्रास कमी भरतील असें म्हणण्याजोगता पुरावा मानसशास्त्राला सापडला नाहीं. साधारणपणें असें म्हणतां येअील की जो व्यवसाय अेखाद्या सामान्य पुरुषाला करतां येतो तो अेखाद्या सामान्य स्त्रीलादेखील करतां येअील. सामान्य पुरुष रणांगणावर जेवढा पराक्रम गाजवूं शकतो तेवढाच पराक्रम गाजवूं शकणाऱ्या स्त्रियांची सेना अुभारणें अशक्य नाही. पुरुष जे जे व्यवसाय करतो ते सर्व करायला स्त्रियांच्या मार्गांत निसर्गानें फारसे अडथळे घातलेले नाहीत. असे अडथळे घालण्यांत निसर्गापेक्षा परंपरागत रूढींचाच भाग अधिक आहे.

## सक्तीचें मातृत्व नि स्वेच्छेचें मातृत्व

शरीरसामर्थ्य, बुद्धिमत्ता व शौर्य हे गुण महत्त्वाचे असले तरी स्त्रियांचें समाजांतील स्थान निश्चित करण्याच्या बाबतींत ते गौण ठरतात. गर्भधारणा फक्त स्त्रीच करूं शकत असल्यामुळे स्त्रीचें मुख्य काम अपत्यजनन व अपत्यपालन हेंच समजलें गेलें आहे. याच कल्पनेच्या आधारावर मातृत्वाची आवड स्त्रीच्या ठायीं जन्मसिद्ध असते असें समजलें जातें. पण आधुनिक मानसशास्त्रानें या समजुतीला धक्का दिला आहे. गर्भधारणा होते ती बहुधा यदृच्छेनें होते. बुद्धिपुर:सर प्रयत्न केल्यामुळे गर्भधारणा झाल्याचीं फारच थोडीं अुदाहरणें सापडतात. आंब्यांतला रस चोखण्यासाठी त्याची साल व कोयदेखील आपण चोखतों, कुस्ती खेळण्याचा आनंद लुटण्यासाठी मातींत अंग भरूं देतों, त्याचप्रमाणें प्रणयाचा आनंद लुटतांना त्याची परिणति गर्भधारणेंत होअूं देतों. मानसशास्त्रज्ञांनी ६६ गर्भवती स्त्रियांना प्रश्न विचारले असतां त्यांच्यांपैकी ४३ स्त्रियांनी आमचें गर्भधारण नियोजित नाही असें सांगितलें. मातृत्वाच्या वाटेवर असलेल्या ८७ स्त्रियांना ‘ तुम्हांला मूल होणार आहे याबद्दल आनंद होतो आहे काय ? ’ असें विचारलें असतां त्यांपैकी ६७ स्त्रियांनी सरळ ‘ नाही ’ असें अुत्तर दिलें. ज्यांचें गर्भधारण नियोजित होतें अशा स्त्रियांनीदेखील नवऱ्याच्या आग्रहामुळे किंवा मूल असणें चांगलें असें सर्व लोक म्हणतात म्हणून आपण याला तयार झालों, अपत्यो-

त्पादनाची भूक आपल्या ठायीं असल्यामुळे नव्हे, असें सांगितलें. कांहींनी तरी घरीं अेकटें बसून काय करावें सुचत नाही, वेळ जात नाही, मूल असल्यास तेवढेंच वेळ घालवायला अेक साधन होअील हें मूल हवेसें वाटण्याचें कारण दिलें.

हें संशोधन पाश्चात्य देशांत झालें आहे. त्यांत जें आढळून आलें तें आपल्या देशांतल्या स्त्रियांना लागू नाही असा यावर नेहमींचा आक्षेप येअील. या आक्षेपाचें अुत्तर असें:— पाश्चात्य संस्कृति व भारतीय संस्कृति यांत फरक असला तरी पाश्चात्यांच्या व भारतीयांच्या सहजप्रवृत्तींदेखील वेगळ्या आहेत असें आजपर्यंत कुणीं म्हटलेलें नाही. पाश्चात्य व भारतीय स्त्रियांच्या जन्मसिद्ध व नैसर्गिक भावनाच वेगळ्या आहेत असे कुणाला म्हणायचें असेल तर प्रश्न वेगळा, पण फक्त संस्कृति वेगळी असल्यामुळे पाश्चात्य स्त्रियांची मातृत्वाची आवड नाहीशी झाली आहे असें म्हटल्यानेदेखील मातृत्वाची आवड संस्कृतीवर अवलंबून आहे, ती सर्वस्वी जन्मसिद्ध नाही हें कबूल केल्यासारखें होतें. शिवाय आपल्या देशांत वरच्यासारखीच विचारपूस केल्यास फारशी वेगळीं अुत्तरें मिळणार नाहीत याबद्दल मला शंका नाही. चांगल्या दर्जाची नोकरी असलेल्या कांही अविवाहित स्त्रियांना “ तुम्हाला स्वतःचीं मुलें असावींत असें वाटत नाही काय ? ” असें मीं विचारलें असतां त्यांनीहि स्पष्टपणें “ नाही ” असें अुत्तर दिलें. या स्त्रियांना जन्मभरच असें वाटत राहील असा हवाला देतां येणार नाही हें खरें, पण साधारणपणें समजलें जातें तेवढें स्त्रियांना मातृत्व प्रिय नाही हें त्यावरून खास दिसून येतें.

स्वेच्छेने प्राप्त झालेलें मातृत्व फार विरळा असतें, स्त्रीवर मातृत्व बहुधा लादलें जातें हें डोळे अुघडे ठेवून समाजजीवनाचें निरीक्षण केल्यास कुणालाहि आढळून येअील. लादलेल्या मातृत्वांत नियमनाची काळजी न घेतल्यामुळे निसर्गाने लादलेल्या मातृत्वाचा समावेश होतोच, पण याहीपेक्षा भोवतालच्या व्यक्तींनी सतत प्रचार केल्यामुळे हव्याशा वाटणाऱ्या मातृत्वाचा बराच मोठा भाग आहे. पूर्वींच्या काळीं लग्न होअून दोनतीन वर्षें झालीं व मूल होत नाहीसें दिसलें की नवरा दुसऱ्या लग्नाचा विचार करूं लागे. अेवढेंच नव्हे तर ‘ मला मूल होत नाही म्हणून तुम्ही दुसरं लग्न करा,’ असा स्वतः बायकोनेच नवऱ्याला आग्रह करावा अशी घरचे लोक अपेक्षा करीत. वांझपणासारखी स्त्रीच्या दृष्टीने दुसरी लाजिरवाणी गोष्ट नाही अशी शिकवणूक सतत कानांवर पडल्यामुळे स्त्रीला मातृत्व हवेसें वाटूं लागे. आजकालसुद्धा मूल व्हायला अुशीर झाल्याबरोबर “ काय कमल, त्या आपल्या विमलला मूलच होत नाही म्हणे अजून. अभागी बिचारी ! ” असे अुद्‌गार अैकूं येअूं लागतात. “ अजून कांही नाही वाटतं तुम्हाला ! ” अशा प्रश्नांचा अपत्यहीन जोडप्यावर मारा होअूं लागतो. मुळीच मूल नसणाऱ्या जोडप्यालाच हा मारा सहन करावा लागतो असें नाही, तर पहिलें मूल झाल्यावर तीनचार वर्षांच्या आंत आता दुसरें कधी होणार? व न झालें तर समाजावर केवढी मोठी आपत्ति येणार आहे या काळजीने आप्तेष्ट बेचैन होअूं लागतात. “ आता तुमच्या कमळीला भाअू पाहिजे बरं का— आता तुमच्या बंड्याला बहीण हवीच— हा निष्काम कर्मयोग पुरे झाला आता ! ” असा वर्षाव सुरू होतो. वॉरन

हेस्टिंग्जसारख्या निढावलेल्या मुत्सद्दयालासुद्धा चौकशीच्या पिंजऱ्यांत बर्क, शेरिडन वगैरे घणाघाती वक्त्यांची आपल्याविरुद्ध सरबत्ती ऐकतांना "आपण अगदी नराधम आहोंत" असें वाटूं लागलें होतें म्हणतात. मग बिचाऱ्या स्त्रीची काय कथा! आप्तेष्टांच्या सरबत्तीमुळे नियमितपणें घरांत पाळणा हालला नाही तर आपलें जीवन व्यर्थ आहे असें तिला वाटूं लागल्यास नवल काय?

वरील विवेचनावरून मातृत्वाची आवड सर्वस्वी कृत्रिम आहे असा कुणीं ग्रह करून घेऊं नये. समाजाचें मुळीच दडपण नसतांनादेखील स्त्रीला मातृत्व हवेसें वाटूं शकेल पण या हौशींचें समाधान अेखाद्या अपत्यानें होण्यासारखें आहे. शिवाय अेखादें का होअीना, पण मूल असल्याशिवाय जीवन व्यर्थ आहे, असें सर्वच स्त्रियांना वाटेल असेंदेखील म्हणतां येत नाही. मुळीच अपत्य नसलें तरी त्यामुळे आपल्या जीवनांत कांही अुणें आहे असें ज्यांना कधीच वाटत नाही अशाहि अनेक स्त्रिया दाखवून देतां येतील.

मातृत्वाच्या बाबतींत स्त्रियांमध्ये बरेंच स्वभाववैचित्र्य आढळतें, याचा प्रत्यय अगदी लहानपणापासून येतो असें कांही मानसशास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. लहानपणीं बाहुल्यांशीं आओीपणाचे खेळ खेळणाऱ्या मुलीच्या ठायीं मोठेपणीं मातृत्वाची होस आढळून येते. मुलांची अतोनात होस असलेली अेक स्त्री होती. रस्त्यांत कुणाच्याहि कडेवर मूल दिसलें की त्याला थोडा वेळ घेऊन त्याचे पापे घेतल्याशिवाय ती पुढे जात नसे. तिला स्वतःचीं चार मुलें होतीं. त्या सर्वांना तिनें शेवटपर्यंत अंगावरच पाजलें. कृत्रिम दुधाच्या फंदांत ती कधीच पडली नाही. तिला दूधहि अगदी पुरेपूर असे. या स्त्रीच्या लहानपणच्या आयुष्याची मानसशास्त्रज्ञांनी चौकशी केली तेव्हा असें आढळून आलें की वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंत ती बाहुल्यांना न्हाऊं घालणें, जेवूं घालणें, निजवणें वगैरे खेळ खेळत असे. शेजारपाजाऱ्यांच्या मुलांना खेळवण्यांतदेखील तिचा बराच वेळ जाअी. या स्त्रीच्या अुलट मातृत्वाची नावड असलेली अेक स्त्री आढळून आली. दुसऱ्याच्या मुलांचें ती फारसें कौतुक करीत नसे. स्वतःच्या मुलांनादेखील दोन आठवड्यांनंतर अंगावर पाजणें तिनें बंद केलें. "अंगावर पाजायची ही काय गुराढोरांसारखी चाल!" असें ती म्हणे. या स्त्रीला लहानपणींदेखील बाहुल्यांशीं आओीपणाचे खेळ खेळायचा कंटाळा असे. वयाच्या सहाव्या वर्षानंतर तर ती बाहुल्यांशीं खेळलीच नाही. या वर्णनावरून या स्त्रीमध्ये स्त्रीत्वच कमी होतें असें कुणीं समजूं नये. स्त्रीत्वाचे अितर गुण तिच्यांत पुरेपूर होते. ती पुरुषांवर सहज मोहिनी पाडत असे. प्रणयाची तिला आवड होती व लग्नापूर्वी वैवाहिक जीवनाचा अनुभव घ्यायला ती अुत्सुक होती.

मातृत्वाची आवड याप्रमाणे कांही लोकांना वाटते तितकी नैसर्गिक, सार्वत्रिक व प्रबळ नसली तरी त्यावरून वात्सल्याची भावना सर्वस्वी दिखाअू आहे असा निष्कर्ष काढणें चुकीचें होअील. अिच्छा नसतांना मूल झालें तरी त्या मुलाबद्दल प्रेम वाटूं शकतें. वर अुल्लेखिलेल्या मातृत्वाची नावड असलेल्या स्त्रीनेदेखील आपल्या मुलांची कधी आबाळ केली नाही व मुलांशीं तिच्या होणाऱ्या वर्तनावरून त्यांच्यावर तिचें प्रेम नाही असें कुणालाहि वाटलें नसतें. कर्तव्यबुद्धि, आपलेपणा व लहान मुलांमध्ये निसर्गतःच असलेली मुग्ध मोहिनी अित्यादि अनेक कारणांमुळे त्यांच्याबद्दल सहज प्रेम वाटूं शकतें.

## मानसशास्त्रानें केलेली पुरुषांची निराशा

मातृत्वाच्या बाबतींत आधुनिक मानसशास्त्रानें स्त्रीविषयक रूढ समजुतींना धक्का दिला आहे. त्याचप्रमाणे अलीकडे डॉ. किन्से व त्यांचे सहकारी यांनी आठ हजार अमेरिकन स्त्रियांच्या कामजीवनाचें जें परीक्षण केलें त्यानें स्त्रीच्या प्रणयप्रियतेबद्दलच्या पुरुषी कल्पनांचा हिरमोड केला आहे. कामजीवन पुरुषाअितकेंच स्त्रीलाहि प्रिय असतें अशी अनेकांची समजूत आहे. साथीच्या वाद्यांमध्ये गायकाच्या प्रत्येक सुराला संवादी सूर असतो, आरशामध्ये ज्याप्रमाणे प्रत्येक बिंबाचें प्रतिबिंब अुमटतें त्याप्रमाणे पुरुषाच्या प्रत्येक अभिलाषेगणिक स्त्रीमध्ये अेक अभिलाषा असते असें आजपर्यंत पुरुषांनी मानलें. अनिच्छेनें पुरुषाशिवाय जन्म काढणाऱ्या स्त्रियांची शृंगाराच्या बाबतींत कशी अुपासमार होते व अतृप्त वासनांच्या वणव्यांत त्या कशा होरपळून निघतात याचीं सहानुभूतिपूर्ण पण काल्पनिक वर्णनें पुरुषांनी केलीं आहेत.

कामशांति न झाल्यामुळे आपली बायको कृष्णपक्षींच्या चंद्राप्रमाणे खंगत चालली असेल (प्राचीमूले तनुमिव कलामात्रशेषां हिमांशोः), स्वप्नांत का होओीना, आपला समागम घडावा म्हणून ती झोपेची आराधना करीत असेल, पण वासनांनी देह तापल्यामुळे तिला झोप येणें अशक्य झालें असेल, अशा दीनवाण्या अवस्थेंत तिचे डोळे अश्रूंनी भरून येत असतील व अश्रूंनी डोळे भिजल्यावर झोप अधिकच दुरावत जात असेल. (मत्संयोगः कथमुपनयेत् स्वप्नजोऽपीति निद्रां। आकांक्षंतीं नयनसलिलोत्पीड रुद्धावकाशाम्) असें मेघदूतांतला यक्ष आपल्या विरहिणी पत्नीचें वर्णन करतो. डॉ. किन्से यांनी अुजेडांत आणलेल्या तथ्यांचा विचार केला तर स्त्रीचें चित्र फार वेगळ्या रीतीने रेखाटावें लागतें. पुरुषाशिवाय आयुष्य काढणाऱ्या स्त्रीची वासनात्मक अुपासमार होत असेल असें पुरुषांनी मानणें म्हणजे स्वतःवरून स्त्रीला ओळखण्याचा प्रयत्न करणें आहे. मानसशास्त्रीय परिभाषेंत याला प्रक्षेपण (प्रोजेक्शन) म्हणतात. पतिविरहामुळे स्त्रीला दुःख होत असलें तरी त्या दुःखांत अतृप्त वासनांच्या दुःखाचा अंश फार कमी असतो. यक्षाने केलेल्या यक्षिणीच्या कामतप्ततेच्या वर्णनांत यक्षिणीच्या वास्तविक अवस्थेपेक्षा यक्षाच्या भावनांचेंच प्रक्षेपण अधिक झालें आहे

पुरुषाची वासना स्त्रीच्या मानाने निदान चौपट असते याचा बिनतोड पुरावा डॉ. किन्से यांनी दिला आहे. आत्मरतीमध्ये सहचर जवळ नसतांना स्वयंस्फूर्तीने कामोद्दीपन होतें, म्हणून वासनेच्या बाहुल्याचा विचार करतांना आत्मरति किनीदा घडते याचा मानसशास्त्रज्ञ विचार करतात. या बाबतींत सर्वसाधारण अविवाहित स्त्रीचें महिन्यास सुमारे दोन, तर सर्वसाधारण अविवाहित पुरुषाचे महिन्यास सुमारे आठ असें प्रमाण पडतें. आत्मरतीप्रमाणेच शृंगारिक स्वप्नेंदेखील स्वयंस्फूर्त असल्यामुळे या बाबतींतदेखील स्त्रीपुरुषांची तुलना अुद्बोधक ठरते. सर्वसाधारण तरुणीला वर्षांतून जास्तींत जास्त चार तर सर्वसाधारण तरुणाला जास्तींत जास्त अकरा पूर्ण कामशांति करणारीं शृंगारिक स्वप्नें पडतात. झोपेंतल्याप्रमाणेच जागेपणींदेखील स्वप्नें पडतात. या स्वप्नांना आपण मनोराज्यें म्हणतों. ज्या अिच्छा सत्यसृष्टींत तृप्त होत नाहीत त्या तृप्त करून घेण्याचें मनोराज्ये हें अेक नेहमीचें साधन आहे. स्त्रियांपेक्षा पुरुषांच्या मनोराज्यांत शृंगाराचें प्रमाण कितीतरी अधिक असतें. पुरुषांच्या मनोराज्यांत ओतीव सोन्यासारखी भास्वर अंगकांति, लतेसारखा सडपातळ बांधा व चंद्रासारखें प्रसन्न मुख असलेली अेखादी वरारोहा असलीच पाहिजे. जगांत अनेक पुरुष असले तरी आपल्या दिशेकडेच तिचे मृगलोचन आकृष्ट होतात व आपल्या दर्शनानेच तिच्या मुखावर स्मित झळकतें, आपली दृष्टि तिच्याकडे वळल्याबरोबर तिच्यावर लाजेचे गुलाब फुलतात व ओसरणारा पदर ती सावरूं लागते. पुरुषी मनोराज्याच्या या कायम ठशावरूनच पुरुष स्त्रीच्या मनोराज्याची कल्पना करतात. शिलाखंडाप्रमाणे ज्याची छाती भरीव व पोलादी आहे, सिंहाप्रमाणे ज्याची कंबर बारीक आहे, थोडीशी हालचाल झाल्याबरोबर ज्याच्या बाहूंवर स्नायूंच्या लहरी अुठू लागतात, ज्याची दृष्टि बेफिकीर व गति धीरोद्धत आहे असा पुरुष स्त्रीच्या मनोराज्यांतला नायक राहात असेल, तिच्या भ्रूभंगाबरोबर तो नाचत असेल, स्मिताने अुजळत असेल व अश्रूंनी पेटत असेल

असें पुरुषांना वाटतें. पण हें फारसें खरें नाही. पुरुषाच्या शरीरसौष्ठवाचें स्त्रियांना फारसें आकर्षण नसतें, त्याचें सतत चिंतन करण्याअितकें तर खात्रीने नसतें अशी हजारो स्त्रियांची साक्ष आहे. कुस्ती वा मुष्टियुद्ध खेळणाऱ्या मल्लांच्या घाटदार व भव्य शरीराचें मला जेवढें सादर कौतुक वाटतें तेवढेंदेखील माझ्या ओळखीच्या बहुतेक स्त्रियांना वाटत नाही असा माझा अनुभव आहे.

मातृत्व व शृंगार या दोन्ही भावना स्त्रियांच्या ठिकाणीं जर अेवढ्या कमी प्रमाणांत असतात तर बहुसंख्य स्त्रिया लग्न करायला कां तयार होतात? या दोन भावनांच्या पायावरच तर विवाहसंस्थेची अुभारणी झाली आहे...असा प्रश्न वरील विवेचनावरून अुपस्थित होतो. या प्रश्नाला अनेक समाधानकारक अुत्तरें आहेत. अेक तर मानवाचें आचरण त्याच्या जन्मसिद्ध प्रवृत्तीं-वरच केवळ अवलंबून नसतें. जन्मसिद्ध प्रवृत्तींपेक्षाहि संस्कारांचें सामर्थ्य फार मोठें आहे. गरम हवेंत कपडे घालण्याची प्रवृत्ति जन्मसिद्ध नसूनदेखील विवस्त्र राहायला कोणी धजावत नाही. खाली पीतांबर व वर कोट-टोपी घालूं नये ही जन्मसिद्ध प्रवृत्ति नाही पण असा पोषाख करून बाहेर हिंडायची कोणाची छाती आहे? विशिष्ट तऱ्हेचाच पोषाख केला पाहिजे ही प्रवृत्ति, जशी जन्मापासून झालेल्या संस्कारांनी आपल्या मनांत खोल रुजते त्याचप्रमाणे 'बायकांच्या जातीने' लग्न करावें, घर पाहावें, मुलें सांभाळावीं हा आदर्श लहान-पणापासून समाजाने स्त्रीपुढे ठेवल्यामुळे बहुसंख्य स्त्रिया लग्न करतात—मातृत्वाची भूक लागल्यामुळे किंवा कामवासना असह्य झाल्यामुळे नव्हे.

## स्त्रीचें व्यवसायस्वातंत्र्य

प्रत्येक पुरुषाने पोट भरण्यासाठी कांहीतरी व्यवसाय केला पाहिजे, त्याच-प्रमाणे आपला योगक्षेम चालवण्यासाठी प्रत्येक स्त्रीने लग्न केलें पाहिजे अशी समाज अपेक्षा करतो. 'तुम्ही कोणता व्यवसाय करतां?' या प्रश्नाला 'गृहिणीचा' असें अुत्तर स्त्री देअूं शकते व हें अुत्तर पूर्णपणें मान्य केलें जातें. आपल्याप्रमाणे पाश्चात्यांतदेखील गृहिणीत्व हाच बहुसंख्य स्त्रियांचा प्रमुख व्यवसाय असतो. यावरून स्त्रीची विवाहाच्या बाबतींतली अेक मुख्य अपेक्षा स्पष्ट होते. जो पुरुष आपला योग-क्षेम चालवूं शकणार नाही त्याच्याशीं स्त्री लग्न करूं अिच्छीत नाही. पाश्चात्यांच्या प्रेमविवाहाच्या पद्धतींतदेखील पुरुष पैसे कितपत मिळवूं शकतो याबद्दल खात्री करून घेतल्याशिवाय स्त्री त्याच्याशीं लग्न करीत नाही. सॉमरसेट मॉमच्या 'रेझर्स अेज्' या कादंबरीची नायिका ज्याच्यावर तिचें अतोनात प्रेम असते त्या पुरुषाशीं लग्न करीत नाही, कारण पैसे न मिळवतां पूर्वी साठवलेल्या पैशावर गुजारा करून आयुष्याचा सर्व वेळ आत्मसंशोधनांत घालवायचा त्याचा विचार असतो. आपल्याकडील कल्पनामग्न तरुणांना वाटतें तितकें पाश्चात्यांच्या प्रेमविवाहाचें स्वरूप काव्यमय नाही. आअीबापांनी ठरव-लेल्या लग्नासारखाच लग्नें जुळविण्याचा तो अेक व्यवहारी व हिशेबी प्रकार आहे.

विवाहाच्या बाबतींत स्त्रीपेक्षा पुरुषाच्या अपेक्षा बऱ्याच वेगळ्या असतात. पुरुषाला शृंगारिक प्रेम करणारी सहचरी हवी असते व या दृष्टीनेच तो विवाहाकडे पाहात असतो. आपला योगक्षेम चालवूं न शकणाऱ्या पुरुषाशीं ज्याप्रमाणे स्त्री लग्न

करूं अिच्छीत नाही, त्याचप्रमाणे आपली शृंगाराची भूक भागवूं न शकणाऱ्या स्त्रीशीं पुरुष जाणूनबुजून लग्न करणार नाही. अर्जनशक्ति हा वराचा तर सौंदर्य हा वधूचा प्रमुख गुण मानला जातो.

स्त्रीपुरुषांच्या विवाहविषयक अपेक्षा याप्रमाणे मुळांतच वेगळ्या असतात. विवाह हेंच स्त्रीचें मुख्य कार्यक्षेत्र आहे, मुलाला नोकरी तसा मुलीला नवरा हा पाहिजेच ही विचारसरणी जोंपर्यंत प्रभावी आहे तोंपर्यंत हें अपरिहार्य आहे. पण आजकाल या विचारसरणीच्या विरुद्ध विचारप्रवाह सुरू झाले आहेत. चांगला नवरा मिळविणें व सुखाचा संसार करणें हेंच स्त्रीचें अितिकर्तव्य नसून तिनेदेखील आपल्याजोगता अेखादा व्यवसाय निवडावा, लग्न करून व्यवसाय करतां येत असेल तर ठीकच, नाहीतर जन्मभर अविवाहित राहूनदेखील आपला अीप्सित व्यवसाय करावा, स्त्रीने लग्न केलेंच पाहिजे असें नाही असें मत पुढे येत आहे.

हें मत किती क्रान्तिकारक आहे याची बहुतेकांना कल्पना नसते. पुरुषाला पूर्ण व्यवसायस्वातंत्र्य असूनदेखील लग्न करावेंसें वाटतें, त्याचप्रमाणे स्त्रियांनाहि पूर्ण व्यवसायस्वातंत्र्य असलें — गृहिणीत्व हाच त्यांचा प्रमुख व्यवसाय मानला गेला नाही— तरी बहुसंख्य स्त्रियांना लग्न करावेंसें वाटेल असें गृहीत धरण्यांत येतें. आधुनिक मानसशास्त्राने सूचित केल्याप्रमाणे स्त्रीच्या ठायीं मातृत्व व शृंगार या दोहोंचीहि आवड जर खरोखरच अत्यल्प असेल तर हें गृहीतकृत्य सपशेल निराधार ठरतें. वाटेल तो व्यवसाय करण्याची स्त्रीला सोय असेल तर मनाजोगता व्यवसाय मिळालेल्या अनेक स्त्रियांना लग्न करावेंसें वाटणार नाही, असा अंदाज मानसशास्त्रीय तथ्यांच्या आधारें करायला हरकत दिसत नाही. अमेरिकेमध्ये पदव्युत्तर वा व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या स्त्रियांपैकी शेकडा ४० स्त्रिया वयाच्या पन्नासाव्या वर्षापर्यंत अविवाहित होत्या असें डॉ. किन्से यांच्या अकडेवारीवरून दिसून येतें. जी स्वतः पैसे मिळवीत नाही अशी स्त्री फार काल अविवाहित राहूं शकणार नाही. आपला 'भार हलका करण्यासाठी' तिचे पालक कसोशीने तिचें लग्न जुळवून आणतातच. अर्थात् अविवाहित राहण्याची प्रवृत्ति आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र असलेल्या स्त्रीमध्येच आढळून येअूं शकते हें अुघड आहे. या प्रवृत्तीचीं अुदाहरणें आपल्या देशांतदेखील सापडणें अशक्य नाही. "अमेरिकेंत तसें होत असेल पण आमची संस्कृति वेगळी आहे" हा नेहमीचा युक्तिवाद येथे गैरलागू आहे.

स्त्रियांमध्ये अविवाहित राहण्याची प्रवृत्ति मोठ्या प्रमाणावर दिसून येअूं लागली तर पुरुषांपुढे अेक मोठीच समस्या निर्माण होअील. सर्वसाधारण पुरुषाची वासना सर्वसाधारण स्त्रीच्या मानाने चौपट असते असें मागे म्हटलें आहे. कामतृप्ति झाली नाही तर पुरुष स्त्रीच्या मानाने कितीतरी अधिक अस्वस्थ होतो. अशा परिस्थितींत शेकडा चाळीस स्त्रिया अविवाहित राहूं लागल्यास पुरुषाच्या कामतृप्तीचा प्रश्न अधिकच बिकट होअून बसेल. विवाह व कामजीवन यांच्याविषयीचे आज मान्य असलेले आदर्श कायम राहिले तर भविष्यकाळांत निदान शेकडा चाळीस पुरुषांना अविवाहित व जन्मभर कामतप्त राहावें लागेल. शेकडा चाळीस पुरुषांच्या अतृप्त तृष्णेचा ताण सहन करण्याअितके आजचे कामविषयक आदर्श भक्कम आहेत अशी ग्वाही देतां येत नाही. हे आदर्श शाश्वत आहेत व कोणत्याहि परिस्थितींत त्यांचें रक्षण झालेंच पाहिजे असें मानणाऱ्या लोकांनी भावी कालांतील वर प्रतिपादलेल्या शक्यतेचा विचार केला पाहिजे.

## स्त्रियांचें पुरुषीकरण

व्यवसायस्वातंत्र्यामुळे स्त्रियांमध्ये अविवाहित राहण्याची प्रवृत्ति वाढेल त्याचप्रमाणे अितर अनेक बाबतींत त्या पुरुषांसारख्या होअूं लागतील. सध्या स्त्रीची राहणी पुरुषाच्या शृंगारप्रिय अभिरुचीच्या अनुरोधाने आखली गेली आहे. समृद्ध केशसंभार, शरीराच्या वक्राकारांना अुठाव देणारा पेहराव व गुलाबी ओठ ही स्त्रीची वेषभूषा पुरुषांना आकर्षक वाटते म्हणून रूढ झाली आहे. स्त्रीपुरुषांत जे नैसर्गिक भेद आहेत त्यांना शक्य तितका अधिक अुठाव द्यावा व जें साम्य आहे त्याला शक्य तितकें झाकून टाकावें हा या वेषभूषेचा प्रमुख अुद्देश आहे. स्त्री पुरुषापेक्षा जेवढी वेगळी दिसेल तेवढें पुरुषाला स्त्रीबद्दल अधिक आकर्षण वाटतें. पुरुषाला कशाचें आकर्षण वाटतें हा आजच्या स्त्रीच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण तिला पुरुषाबरोबरच जीवन कंठावयाचें असतें. पण स्त्रीला पूर्ण व्यवसाय-स्वातंत्र्य मिळाल्यावर

पुरुषाला काय आवडतें याचा फारसा विचार करायचें तिला कारण अुरणार नाही. आपल्या भ्रमरपुंजासारख्या केसांच्या आंदोलनाबरोबर पुरुषाचें हृदय हेलकावे खाअूं लागतें याला महत्व देण्याअैवजी अेवढा भार डोक्यावर वागवल्याने आपल्याला अुकडण्याचा व घामाचा त्रास होतो याचाच विचार ती आधी करणार. अुंच टाचेचे बूट घातल्याने व तंग पेहराव केल्याने आपला बांधा नागाकृति दिसतो व त्याकडे पाहून पुरुष मोहित होतो याच्याशीं तिला काय करावयाचें आहे? दुरून पाहणाऱ्या पुरुषाला काय वाटतें यापेक्षा अुंच टाचेच्या सुळक्यावर चालतांना व आवळलेल्या वस्त्रांचे फास सहन करतांना आपल्याला काय दुःख होतें याचा विचार तिला आधी करावासा वाटेल. पुरुषाच्या दृष्टिसुखापेक्षा स्वतःची सोय पाहूनच ती आपला पोषाख निवडील. पुरुषांच्या पोषाखांत सोयीचा विचार अधिक केलेला आहे, म्हणून हाच पोखाख वापरण्याची प्रवृत्ति स्त्रियांमध्ये अधिकाधिक दिसूं लागेल. पाश्चात्य देशांत कांही स्त्रिया अितका पुरुषी पोषाख करूं लागल्या आहेत की पांचदहा फुटावरून त्या स्त्रिया आहेत हेंदेखील ओळखूं येत नाही!

स्त्रियांचें पुरुषीकरण फक्त पोषाखा-पुरतेंच मर्यादित राहणार नाही. त्यांच्या सर्वच वागणुकींत त्यामुळे क्रांतिकारक बदल होअील. पुरुषाच्या आश्रयशिवाय स्त्री शोभत नाही हें तत्त्व झुगारलें गेल्यावर लज्जा, भीरुत्व अित्यादि स्त्रीसुलभ मानले गेलेले गुण स्त्रियांना भूषणावह वाटणार नाहीत. आवडत्या पुरुषाच्या सान्निध्याने अंगावर रोमांच व गालावर लाली येणें आणि पदर थोडासा ओसरल्यावर शरिरांत विजेचा संचार होणें हे स्त्रियांचे विभ्रम कवींचे मोठे आवडते आहेत, पण अुद्याच्या स्त्रीला ते बालिश वाटण्याचा संभव आहे. प्रियकर जिला लाडाने 'भोरु!' म्हणून संबोधतो व मेघगर्जना झाल्याबरोबर जिवाचा थरकाप अुडून आत्मरक्षणासाठी जी त्याच्या बाहुपाशांत शिरते ती काव्यांतली स्त्री, कुत्र्याच्या भुंकण्याने थरथर कापणाऱ्या भित्र्या पुरुषासारखीच अुद्याच्या स्त्रीला तुच्छ वाटेल. भावनांप्रमाणेच 'अिश्श, अय्या, अगबाअी' यांसारखे स्त्रीविशिष्ट शब्दप्रयोग व मुरका, भ्रूविलास, ग्रीवाभंग यांसारखे स्त्रीसुलभ हावभाव 'अेके काळीं असें होतें' या सदरांत जाअून पडतील.

स्त्रीचें याप्रमाणे पुरुषीकरण झालें तर पुरुषांना स्त्रियांबद्दल वाटणारें आकर्षण पुष्कळ अंशाने कमी होअील. पुरुषाला स्त्रीबद्दल वाटणारें आकर्षण सर्वस्वी

जन्मसिद्ध नाही. स्त्रीपुरुषांत असलेल्या थोड्याशा नैसर्गिक भेदांना शक्य तितकें अधिक प्राधान्य मिळेल अशा रीतीने स्त्रीची राहणी आखली गेल्यामुळे व कला नि साहित्य यांनी स्त्रीभोवती काव्यमयतेचें वलय निर्माण केल्यामुळे पुरुषाला स्त्रीबद्दल अेवढें जबर आकर्षण वाटतें. मानवी अनुभवांमध्ये सांस्कृतिक प्रभावांचा वांटा फार मोठा असतो. स्त्रीपुरुषांतील भेदांना महत्त्व न देणाऱ्या संस्कृतींत वाढलेल्या पुरुषाच्या मनांत स्त्रीबद्दल काव्यमय आकर्षण निर्माण होणें कठीण आहे. आजच्या अमेरिकन समाजांतदेखील सुमारें दहा टक्के पुरुषांना पुरुषांपेक्षा स्त्रीचें आकर्षण जास्त वाटत नाही (डॉ. किन्से यांचे आकडे पाहा). स्त्रियांचें पुरुषीकरण झाल्यावर अशा पुरुषांची संख्या वाढेल. स्त्री ही स्त्री आहे ही जाणीव सतत राहिली नाही तर तिच्या-बद्दलचें आकर्षण कमी होतें, याबद्दल माझ्या अेका मित्राने सांगितलेला खालील अनुभव अुद्बोधक आहे. "रात्रीं गाडींत प्रवास करीत असतांना मी बाकावर पडलों होतों. डोळे मिटले होते पण झोप लागली नव्हती. माझ्या हातावर अेक हात ठेवला गेला. तो हात माझ्या प्रेयसीचा असें समजून मी मोठ्या प्रेमाने तो दाबूं लागलों, कुरवाळूं लागलों. थोडा वेळ निरतिशय स्पर्शसुखाचा अनुभव मला आला. पण मला काय दुर्बुद्धि सुचली कुणास ठाअूक, मीं डोळे अुघडून पाहिलें. तो हात बाकामधल्या जागेंत बसून डुलक्या घेणाऱ्या अेका तरुणाचा होता! माझी प्रेयसी दुसऱ्या बाकावर जास्त सोयीची जागा मिळाल्यामुळे तिथे जाअून बसली होती. साखर समजून मीठ खाणाऱ्या माणसा-सारखा माझा चेहरा पाहण्यासारखा झाला!" माझ्या मित्राचें स्पर्शसुख स्त्रीचा हात आपल्या हातांत आहे या कल्पनेवर अवलंबून होतें. स्त्रीच्या स्त्रीत्वाची जाणीव शृंगाराला किती आवश्यक आहे हें यावरून दिसून येतें.

स्त्रीपुरुषांतले सर्व कृत्रिम भेद नाहीसे केले तर कोणकोणत्या प्रवृत्ति निर्माण होतील याचें आतापर्यंत दिग्दर्शन केलें. या प्रवृत्ति चांगल्या की वाअीट हा प्रश्न स्वतंत्र आहे. या बाबतींत व्यक्तीव्यक्तींच्या अभिरुचीप्रमाणे नाना मतें असणार. पण कोणत्याहि गोष्टीच्या परिणामांचें पूर्ण आकलन होणें अिष्ट असतें. या दृष्टीने व आधुनिक मानसशास्त्राने प्रकाशांत आणलेलीं तथ्यें यथार्थ आहेत असें गृहीत धरून हें विवेचन केलेलें आहे.